**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.**

**दिनांक 30.06.2010 रोजी (दि.29.06.2010 ची तहकुब सभा (का.प.क्रं.04)) संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 30 जुन 2010 रोजी (दि.29.06.2010 रोजीची तहकुब सभा) मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे सकाळी 11.30 वाजता **वंदेमातरम्** या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.खान आगा मीयॉ
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

श्री.मधुकर सावंत :विषय पत्रिकेस सुरूवात करण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने जबाबदारी फिक्स केली असेल व अधिकारी यांची कमिटी स्थापन केली असेल तर त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. जबाबदारी फिक्स करून विषय मंजूर करावा.

मा.आयुक्त :काल बैठकीत झालेल्या चर्चेनुसार गणवेश खरेदी संदर्भात 4 अधिकाऱ्यांची समिती नेमण्यात आलेली आहे. उपआयुक्त (प्र), आस्थापना अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि लेखाधिकारी यांनी या संदर्भात गुणवत्तेची सर्व तपासणी करून जबाबदारी यासंदर्भात तसेच विहीत कालावधीमध्ये काम होईल याबाबतीत सल्ला मागविला होता त्यांनी याबाबत सर्व कागदपत्रांची पहाणी केलेली आहे. अहवाल नुकताच प्राप्त झालेला आहे.

श्री.मधुकर सावंत :कमिटीमध्ये दोन स्थायी सदस्यांची नेमणुक करावी.

श्री.जगदिश सिध्द :अधिकाऱ्यांवर जबाबदारी फिक्स केली म्हणजे कोणती जबाबदारी फिक्स केली याचा खुलासा करण्यात यावा.

प्र.उपआयुक्त(प्र) :शासन निर्णयाचा अभ्यास करून उपआयुक्त(प्र) यांनी सभागृहात अहवाल वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती :दुसऱ्या एजन्सीला काम दिले आणि निवीदा जास्त आल्यास महानगरपालिकेस भुर्दंड सहन करावा लागेल आता ऑर्डर दिल्यास 15 तारखेपर्यंत होणे शक्य नाही. दुसऱ्या एजन्सीला काम दिल्यास तीन महिणे साधारणतः लागु शकतात. सर्व सदस्यांना विनंती आहे की, प्रशासनाने एक समिती गठीत केलेली आहे त्यामुळे प्रशासनाने लवकरात लवकर गणवेश कसे मिळतील.

श्री.विकास जैन :सदरील अहवाल वाचून दाखविण्यात आला तो शासनाचा आहे की, महानगरपालिकेचा आहे.

प्र.उपआयुक्त(प्र) :महानगरपालिका प्रशासनाने तयार केलेला आहे

श्री.विकास जैन :प्रशासनाची काय भुमिका आहे स्पष्ट करावी.

प्र.उपआयुक्त(प्र) :दोन आठवडे जर मुदतवाढ मागीतली तर ती देऊ शकतो त्यावर कुठलाही दंड आकारू शकत नाही.

श्री.विकास जैन :15 ऑगष्ट हा विषय सभागृहात चालू आहे. प्रशासनाने खुलासा केला आहे की, 15 ऑगष्टपर्यंत जर ड्रेसचा पुरवठा झाला नाहीतर दोन आठवडयांची मुदतवाढ देउ शकतो त्यात कुठलाही दंड आकारला जाऊ शकत नाही. मुदतवाढ हा शब्द प्रशासन वगळू शकतो काय?

मा.सभापती :तीन ड्रेस पैकी एक ड्रेस 15 ऑगष्ट पर्यंत देण्यात यावा असे आदेश देण्यात यावे व हा विषय मंजूर करावा.

श्री.विकास जैन :मागील तीन वर्षी कोणत्या एजन्सीला काम देण्यात येत होते.

मा.सभापती :नविन बॉडी अस्तित्वात आलेली आहे . सभागृहात चांगले निर्णय घ्यायचे आहे.

श्री.विकास जैन :माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने समाधानकारक माहिती देण्यात यावी.

श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार :सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केल्यानंतर केंद्र समिती कोणती आहे त्याबाबत माहिती देण्यात यावी. कलावती महिला मंडळ सारख्या 24 संस्था आहेत त्या सोडुन मे.कलावती म.मं. यांनाच का म्हणुन काम देण्याचे आदेश देण्यात आले. शासनाचे आदेश आहे की, प्राधान्य द्यावे काम द्यावे असे नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

आस्थापना प्रमुख-1 :मागच्या वेळेस मफतलाल फॅब्रीकस् यांना खरेदीचे आदेश देण्यात आले होते आणि त्यांनी पुरवठा केलेला आहे.

श्री.विकास जैन :मागचे दर आणि या वर्षीचे दर याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्या वर्षीच्या आणि या वर्षीच्या दरामध्ये जर फरक असेल मागच्या वर्षीचे दर कमी असेल तर 5 (2) 2 मंजूरी देता येईल. मागच्या वर्षी पेव्हर ब्लॉकला मंजूरी दिलेली आहे मग या विषयास मंजूरी द्यायला पाहिजे.

श्री.विकास जैन :सदरील निधी हा शासनाचा नसुन महानगरपालिकेचा आहे.

मा.सभापती :स.सर्व सदस्यांच्या भावना हया मुलांना ड्रेस मिळाव्या म्हणुन आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेचा पैसा हा जनतेचा पैसा आहे तो वाया जाऊ नये.

मा.सभापती :प्रशासनाने समिती गठीत केलेली आहे.

श्री.विकास जैन :मागचे टेंडर विषयी खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :लेखी खुलासा दिला जाईल.

श्री.विकास जैन :मागच्या वर्षीच्या आणि या वर्षीच्या दरामध्ये किती फरक आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार; केंद्र समितीबाबत खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :गणवेश खरेदी संदर्भात जी केंद्रीय समिती स्थापन केलेली आहे त्यात Maharashtra Purchase Mannual मध्ये ज्या सूचना आहेत त्यानुषंगाने केंद्रीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे त्यात मा.आयुक्त केंद्रीय समितीचे अध्यक्ष आहेत मुख्य लेखाधिकारी सचिव आहेत, मुख्य लेखापरिक्षक व उपआयुक्त (प्र) सदस्य आहेत कुठलीही खरेदी करत असतांना केंद्रीय समितीने त्याची छाननी करावी नंतर विषय सक्षम प्राधिकाऱ्यासमोर आणावा असा नियम आहे अशी योजना आहे. 2 जानेवारी 1992 चा जो शासन निर्णय आहे त्यात कुठलीही खरेदी करण्यासाठी सर्वसमावेशक असा शासन निर्णय काढलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :केंद्रिय समितीचे समाधान झाले की, तो विषय मंजूर करण्यास हरकत नाही असा आहे.

मुख्य लेखाधिकारी :केंद्रिय समितीने प्रथम छाननी करावी आणि त्या त्या प्राधिकाऱ्या- समोर ठेवावे. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयामध्ये वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सुधारणा करण्यासाठी 2 फेब्रुवारी 2003 चा शासन निर्णय आहे त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, जानेवारी 1992 च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कुठल्याही प्रकारची खरेदी करण्यात यावी. त्या नियमाचे पालन करण्यात यावे त्या तरतुदीचे पालन केले गेले नाही तर ती आर्थिक गैरव्यवहार समजून संबधीत अधिकारी यांचेवरती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल अशा प्रकारचा स्पष्ट शासन निर्णय आहे. त्यानुषंगाने डिसेंबर 2009 चा शासन निर्णय निघालेला आहे मे.कलावती महिला मंडळाला खरेदीसाठी दर करार शासनाने केलेला आहे. शासन ज्यावेळेस एखाद्या संस्थेशी दर करार करतो त्यावेळेस शासन स्तरावरती मोठे टेंडर करण्यात येते. टेंडरमधून त्यात्या वेळेला एजन्सी फिक्स केले जातात त्या एजन्सीची पुर्ण क्षमता तपासणीचे काम शासन स्तरावरती करण्यात येते. त्यानुसार दर करार शासन करतात. सदर एजन्सीची क्षमता आर्थिक क्षमता,मॅनपावर, यांत्रिकी मनपाने न पहाता शासनाने पाहिलेली आहे. त्यानुषंगाने सदर दर करार प्राप्त झाल्यानंतर मनपाने विषय सर्वसाधारण सभेत खरेदीसाठी ठेवलेला आहे. मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर दर मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर ठेवलेला आहे.

श्री.विकास जैन :जनतेचा पैसा आहे मनपाचे आणि जनतेचे हित पहावयाचे आहे जनतेचा पैसा असल्याने शासन मनपावर बंधन लादु शकत शकत नाही.ज्या पध्दतीने काम अलॉट केले जाते त्यास आक्षेप आहे.मागच्या वर्षी कुठल्या एजन्सीला काम देण्यात आले होते. सन 1992 पासुन सदर आदेशाचे पालन का करण्यात आले नाही.

मा.सभापती :शासनाचे आदेशाचे पालन झाले नाही आणि यात गैरव्यवहार झाल्यास, जास्तीचे टेंडर आल्यास सर्वस्वी जबाबदार आपणास धरण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :यापेक्षा कमी दराने कुठली एजन्सी काम करण्यास तयार असेल तर देण्यास हरकत नाही.

मा.सभापती :दर शासनाने ठरविलेले आहे. मा.सर्वसाधारण सभेनेही मान्यता दिलेली आहे. हा विषय मंजूर करून मागच्या वर्षीचा खुलासा घेऊ.

श्री.विकास जैन :मागच्या वर्षीच्या आणि चालु वर्षामध्ये किती तफावत आहे याची माहीती देण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :गेल्या बऱ्याच वेळा पासुन या विषयावर चर्चा चालु आहे. ज्या सदस्यांची जी मागणी असेल ती लेखी स्वरूपात देण्यात यावी. विषय मंजूर करण्यात यावा. सभागृहाचा वेळ वाया जात आहे.

श्री.विकास जैन :जनतेच्या हितासाठी या ठिकाणी आलेलो आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:मे.कलावती महिला मंडळ, ठाणे हि संस्था ठाणे महानगरपालिका मध्ये काम करू शकते काय?

मा.सभापती :पुर्ण राज्यासाठी शासन निर्णय लागु केलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:संपुर्ण राज्यासाठी लागु नाही. ठाणे महानगरपालिकेमध्ये काम करण्याचे अधिकार आहे काय?

मा.सभापती :या संस्थेला द्यावे म्हणुन शासनाने शासन निर्णय लागु केलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाच्या अध्यादेशाप्रमाणे कारवाई चालु आहे त्यात मुद्दा क्रमांक 12 मध्ये पाच ठिकाणे वगळुन काम देण्याचे सूचित केलेले आहे. ठाणे महानगरपालिकामध्ये सदर संस्था काम करू शकते काय? माहिती देण्यात यावी.

श्री.विकास जैन :मागील वर्षाचे दर याबाबतीत माहिती देण्यात यावी.

आस्थापना प्रमुख-1 :बालवाडी या वर्गाचे मागील दर शर्ट आणि हाफ पँन्ट 166.60 पैसे दर होते.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्या वर्षीचे आणि यावर्षीचे टेंडर किती रूपयांचे याची माहिती देण्यात यावी.

आस्थापना प्रमुख-1 :मागील वर्षाचे टेंडर 1 कोटी 34 लाखाचे होते यावर्षी 2 कोटी 22 लाख रूपयांचे टेंडर आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्या वर्षी विद्यार्थी संख्या या वर्षीपैक्षा जास्त असतांना एवढा जास्तीचा दर यावर्षी का देण्यात येत आहे.

आस्थापना प्रमुख-1 :75 लाखाचे शिल्लक गणवेश मागील वर्षाचे त्याचे वाटप करण्यात आले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :एका वर्षात विद्यार्थी संख्या 3 हजारांनी कमी हेऊन 75 लाख गणवेश वाटप केले आहे. विद्यार्थी संख्या वाढली म्हणुन खर्च वाढला हे समजू शकते परंतु विद्यार्थी संख्या घटलेली असतांना खर्च वाढत आहे.

आस्थापना प्रमुख-1 :पहिलीचे 2704 गणवेश खरेदी केले होते त्याचा दर 176 रूपये होता. दुसरीचे 1994 186.20 पैसे तिसरी-2672 रूपये 196.

मा.सभापती :या दरास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, सदरील विषय मंजूर करण्यात यावा. हा विषय मंजूर करण्यात येत आहे. अपेक्षीत लेखी खुलासा कळविण्यांत येईल.

श्री.विकास जैन :या विषयावर मतदान घेण्यात यावे. सभागृहात मतदानाची मागणी केलेली नियमात तरतुदी बाबत मा.सचिव यांनी खुलासा करावा.

मा.सभापती :सदरील दर हा शासनाने ठरविलेला आहे आणि मा.सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे.

श्री.विकास जैन :शासनाचे असे किती जी.आर आहेत अशा किती संस्था आहे त्यात स्पष्टपणे दिलेले आहे त्यानुसारच कामे केली पाहिजे पण मनपा कुठलीच खरेदी करत नाही. निवीदा काढुन खरेदी केली जाते.

मा.सभापती :मा.सर्वसाधारण सभा आणि मा.महापौर यांचा अवमान होईल. सर्वसाधारण सभेत विरोध करायला हवा होता.

श्री.विकास जैन :गणवेश खरेदी करण्यास विरोध नाही खरेदी करण्याच्या पध्दतीस विरोध आहे. प्रशासनाने जे दर ठेवले आहे त्यास विरोध आहे.

मा.सभापती :कालच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे एक कमिटी नेमण्यात आलेली आहे. कमिटी यावर नियंत्रण ठेवेल. गैरव्यवहार झाल्यास कमिटी जबाबदार ठरेल.

श्री.विकास जैन :प्रशासनाच्या नियमावलीत 15 ऑगष्ट नंतर दोन आठवडे वाढु शकतात.

श्री.मधुकर सावंत :विषय मंजूर करण्यात आलेला आहे परत त्यावर र्चा का करत आहे.

श्री.विकास जैन :नियमास धरून मतदानाची मागणी करत आहे.

मा.सभापती :कालच्या बैठकीत कमिटी नेमण्यासाठी सभा तहकूब करण्यात आली होती. त्यानुसार समिती नेमण्यात आली आहे समिती कामकाज बघणार आहे. 15 ऑगष्ट पर्यंत एक तरी ड्रेस दिला पाहिजे असे आदेश दिला आहे. या विषयास विरोध करणे म्हणजे मा.महापौर यांना विरोध करणे असा होतो.

श्री.विकास जैन :शासनाचा विरोध करत आहे.

मा.सभापती :मा.सर्वसाधारण सभेने या विषयास मंजूरी दिलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.सर्वसाधारण सभेने आपल्याला पॉलिसी मॅटरमध्ये विद्यार्थ्यांना गणवेश द्यावे या अटीवर मंजूरी दिली होती त्यास आजही आमची हरकत नाही. गणवेश 15 ऑगष्ट ला दिले गेले पाहिजे हे आमचे ठाम मत आहे. ज्या पध्दतीने दराने जात नाही यास आमचा विरोध आहे.

मा.सभापती :दोन सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल तसेच अधिकाऱ्यांना तशा सूचना देण्यात येईल. ठराव मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.विकास जैन :अतिशय पोटनिडकीने हा विषय मांडत आहे. महानगरपालिकेचा आर्थिक विषयाच्या निगडीत आहे.

श्री.नासेर खान :बऱ्याच वेळापासुन सदरच्या विषयावर चर्चा चालु आहे. प्रशासनाने प्रत्येक गोष्टींचा खुलासा केलेला आहे. मनपाच्या शाळेत गरीब घरातील मुले शिक्षण घेतात त्यास आपण विरोध करत आहे. हे योग्य नाही म्हणजेच आपण शहरातील सर्वच गरीब विद्यार्थ्यांचा विरोध करत आहे असा अर्थ होत आहे. विद्यार्थ्यांना 15 ऑगष्ट च्यापुर्वी गणवेश मिळायला पाहिजे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

श्री.विकास जैन :प्रशासनाने नियमावली तयार केली आहे. 15 ऑगष्ट ची गॅरंटी प्रशासन घेत आहे काय?

श्री.रेणुकादास वैद्य :मनपाच्या विद्यार्थ्यांना गणवेश मिळायला पाहिजे हि आमची भुमिका आहे परंतु प्रशासन जास्तीचा पैसा खर्च करीत आहे.

मा.सभापती :प्रशासनास आदेशित करण्यात येते की, 15 ऑगष्ट पर्यंत एक तरी ड्रेस वितरीत व्हावा हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.विकास जैन :जेवढी ऑर्डर आहे तेवढी पुर्ण आली पाहिजे. शासनाचे, प्रशासनाचे आणि सभागृहाचे पुर्णपणे निषेध करण्यात येतो.

श्री.रेणुकादास वैद्य :जनतेच्या पैशाचा योग्य वापर न केल्यामुळे निषेध करतो व या सभेचा त्याग करतो.

(स.सदस्य सभागृहातुन निघुन जातात)

मा.सभापती : 15 ऑगष्ट पर्यंत प्रत्येकी एक गणवेश वितरीत व्हावा असा प्रयत्न असावा. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. शासनाने दर निश्चित केलेले आहेत. शासनाचा आणि उच्च सभागृहाचा मान ठेवून महानगरपालिकेचे यात कुठलेही आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता मा.आयुक्तांनी आणि संबंधीत अधिकारी यांनी घ्यावी. जर हे टेंडरला गेले आणि जास्तीचे दर आले तर जबाबदारी बॉडीवर येऊ शकते. म्हणून सदरचा विषय मंजूर यासाठी करण्यात येतो की, शासनाचा आणि सन्माननीय सदस्यांचा, सर्वसाधारण सभेच्या ठरावाला पाठींबा देऊन हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेअंतर्गत प्रतिवर्षी 03 गणवेश (दोन रंगीत व 01 पांढरा) पुरविण्याकरीता दिनांक 19/06/2010 रोजीच्या सर्वसाधारण सभेत मे. कलावती महिला मंडळ, यांचेकडून सन 2010-2011 या वर्षासाठी मनपा शालेय विद्यार्थ्यांना देय असलेले गणवेश खरेदीस मान्यता प्रदान केल्यानुसार आणि शासन निर्णय क्रमांक भांखस 2009/(प्र.क्र.30)/उद्योग-4, मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 8 डिसेबंर 2009 नुसार, दिनांक 21-6-2010 रोजी केंद्रीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या विवरणानुसार व शिक्षण विभागाने मार्च 2010 च्या केलेल्या विद्यार्थी संख्येच्या मागणीनुसार तयार शालेय गणवेष या बाबीसाठी मे. कलावती महिला मंडळ, महात्मा फुलेनगर, ठाणे (पश्चिम) या संस्थेला आरक्षण देण्यात आले असल्याने शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार येणाऱ्या रू.2,22,74,916/- च्या खर्चास व सदर साहित्य मे. कलावती महिला मंडळ, ठाणे (पश्चिम) यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 10 :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना औरंगाबाद शहर व जिल्ह्यासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 महाराष्ट्र आग प्रतिबंधक, जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06.12.2008 व आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/डी.एम.-1 दि.25.07.2006 नुसार सेवा पुरवण्यासाठी औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी शहरातील एकूण तीन फायर व सहा विभागीय कार्यालयासाठी एकूण 10 पोर्टबल पंप खरेदी करावयाचे आहे.

औरंगाबाद अग्निशमन दलासाठी पावसाळ्यात व उन्हाळ्यात विहीरीचे पाणी काढयाचे तसेच पुराचे पाणी काढण्यासाठी फ्लोटींग पंपाची अत्यंत आवश्यकता आहे. अग्निशमन विभागात सध्या अस्तित्वात असलेल्या साध्या पंपाने खोल विहीरीतून पाणी काढणे शक्य होत नाही कारण पपांची सक्शन

लीफ्ट करण्याची पंपाची क्षमता 7.5 मीटरची आहे यापेक्षा जास्त नाही. या पूर्वी अग्निशमन विभागासाठी 24.04.1995 रोजी एकच फ्लोटींग पंप खरेदी करण्यात आला होता. त्या पपांची लाईफ संपत आलेली आहे. फायर कॉल/ रेस्क्यु कॉल यावर सक्षमपणे काम करण्यासाठी फ्लोटींग पंपाची आवश्यकता आहे.

सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.785 दि.21.12.2009 नुसार एकूण 10 पंप खरेदी रूपये 72,38,000/- मान्यता मिळालेली आहे. यासाठी प्रशासकीय मान्यता दिनांक 18.02.2010 रोजी देण्यात आलेली आहे. जाहीर निविदा राज्यस्तरीय वर्तमान पत्र दैनिक सामना, मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद, दैनिक पुण्यनगरी औरंगाबाद तसेच ई- टेंडर मार्फत दर मागविण्यात आलेले आहेत. याबाबत चार निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झालेल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत. 1) बॅबोलॅट असोसियटस 2) हायटेक इंजिनीअर्स 3) टी.आय. फायर इंजिनीअरींग व 4) श्री सर्व्हीसेस यांच्या निविदापैकी श्री सर्व्हीसेस यांची निविदा तांत्रिक दृष्ट्या अपात्र असल्यामुळे उघडण्यात आलेली नाही. यापैकी सर्वात कमी दराची बॅबोलॅट असोसियटस यांची निविदा फ्लोंटीग पंपाची 10 No. रूपये 70,10,000/- ची आहे.

अंदाजीत रकमेपेक्षा मा.आयुक्त यांच्या दालनात दर कमी करून रूपये 69,39,900/- या दरास प्रशासकीय मान्यता देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर व जिल्ह्यासाठी तसेच विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 महाराष्ट्र आग प्रतिबंधक, जीव संरक्षण कायदा 2006 ची अंमलबजावणी दिनांक 06.12.2008 व आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्याचा शासन निर्णय 2006/क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/डी.एम.-1 दि.25.07.2006 नुसार सेवा पुरवण्यासाठी औरंगाबाद शहराची लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी शहरातील एकूण तीन फायर स्टेशन व सहा विभागीय कार्यालयासाठी एकूण 10 पोर्टबल फ्लोटींग पंप खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार बॅबोलॅट असोसियटस यांचे रूपये 69,39,900/- या दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 11 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. 13, अंतर्गत किलेअर्क पासून मुख्य जलवाहीनी 450 मि.मी. व्यासाची आरसीसी जलवाहिनी पर्यंत 150 मि.मी. व्यासाची डीआयके-7 जलवाहिनी टाकणे. या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 14,75,800/- एवढेचे अंदाजपत्रक बनविले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कामाची निकड लक्षात घेता स्थायी समितीची मान्यता न घेता ई-निविदा मागविण्यात आल्या. ई निविदा विभागामार्फत निविदा प्रसिध्द केली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण 01 निविदा दर भरून प्राप्त झाल्या.

1. श्री.एस.बी.सादवाणी - 4.1% कमी दराने

वरीलप्रमाणे एकच निविदा प्राप्त असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.1 % कमी दराची निविदा श्री.एस.बी.सादवाणी यांची आहे. उक्त निविदा दरास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.1% कमी दराची निविदा श्री.एस.बी.सादवाणी यांची निविदा तसेच अंदाजपत्रकास मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. 13, अंतर्गत किलेअर्क पासून मुख्य जलवाहीनी 450 मि.मी. व्यासाची आरसीसी जलवाहिनी पर्यंत 150 मि.मी. व्यासाची डीआयके-7 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.एस.बी.सादवाणी यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 4.1% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 12 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रोझाबाग सॅटलिंग टँक येथे पाणी पुरवठा करण्यासाठी 150 मि.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकणे. या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 13,74,300/- एवढेचे अंदाजपत्रक बनविले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. कामाची निकड लक्षात घेता स्थायी समितीची मान्यता न घेता ई-निविदा मागविण्यात आल्या. ई निविदा विभागामार्फत निविदा प्रसिध्द केली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण 02 निविदा दर भरून प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | मे. उदय इंजिनिअरींग वर्क्स | - | 6.15% कमी दराने |
| 2. | श्री.एस.बी.सादवाणी | - | 6.01% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.15 % कमी दराची निविदा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची आहे. उक्त निविदा दरास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.15 % कमी दराची निविदा मे.उदय इंजिनिअरींग यांची निविदा तसेच अंदाजपत्रकास मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोझाबाग सॅटलिंग टँक येथे पाणी पुरवठा करण्यासाठी 150 मि.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 6.15 % कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 13 :**

(कार्यक्रम पत्रिका क्र.02-दि.19/6/2010 च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.06)

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. 51 (दक्षिण) अंतर्गत गल्ली नं.22, 23 व 24 इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकणे या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2008-09 नुसार रक्कम रू.12,50,641/- एवढ्याचे अंदाजपत्रक करण्यात आले होते. त्यास मा.स्थायी समिती विषय क्र.390 दि.15/2/2010 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | 13.00 % कमी दराने |
| 02. | श्री.सुरेश बी.साधवानी | 12.70 % कमी दराने |
| 03. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 9.86 % कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00 % कमी दराची निविदा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00 टक्के कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेबाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. 51 (दक्षिण) अंतर्गत गल्ली नं.22, 23 व 24 इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.00 % कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 14 :**

(कार्यक्रम पत्रिका क्र.02-दि.19/6/2010 च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.07)

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.14 अंतर्गत छत्रपतीनगर व भारतमातानगर येथे 100, 150 व 200 मीमी व्यासाची डी.आय.के. 7 जलवाहीनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसूची सन 2008-09 नुसार रक्कम रू.14,91,000/- एवढ्याचे अंदाजपत्रक करण्यात आले आहे. मा.स्थायी समिती विषय क्र.365 दि.11/2/2010 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता प्राप्त निविदाचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | 12.99 % कमी दराने |
| 02. | सुरेश बी.साधवानी | 12.70 % कमी दराने |
| 03. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 08.86 % कमी दराने |
| 04. | व्ही.एस.देशमुख | 04.64 % कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.99 % कमी दराने आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.99 % कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेबाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.14 अंतर्गत छत्रपतीनगर व भारतमातानगर येथे 100, 150 व 200 मीमी व्यासाची डी.आय.के. 7 जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.99 % कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 15 :**

संचालक, प्राणिसंग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणि संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी एका वर्षाकरीता ई-टेंडरद्वारे फेर निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण सहा निविदांची विक्री झाली असून एकूण तीन भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नांव | भाव प्रति किलो रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री अब्दुल हमीद कुरैशी | रूपये 60=00 |
| 02. | श्री फेरोजखान रहेमानखान | रूपये 70=00 |
| 03. | श्री गफुर मिया कुरैशी | रूपये 80=00 |

तीन निविदा धारकांपैकी तुलनात्मकदृष्टीने श्री अब्दुल हमीद कुरैशी यांचे दर रूपये 60=00 प्रति किलो असून निविदा धारकाशी चर्चा केल्यानंतर त्यांनी रूपये 55=00 प्रति किलो दराने बीफचा पुरवठा करणेस संमती दिलेली आहे व या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

प्राणिसंग्रहालयात वाघ, सिंह, कोल्हे, लांडगे, तरस, मगर, ऊदबिल्ले असे एकूण 28 मांसाहारी प्राणी असून सेंट्रल झु ॲथॉरिटी, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार प्राण्यांकरीता खाद्य पुरवठासाठी वार्षिक खर्च रूपये 35,00,000/- अपेक्षित आहे.

तुलनात्मक दरानुसार बीफ खरेदीसाठी श्री अब्दुल हमीद कुरैशी यांचे दर रूपये 55=00 प्रति किलो विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

**<u>संवाद :</u>**

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :ऐणवेळीचे दोन विषय ठेवण्यात आलेले आहे. ब्लिचिंग पावडर खरेदीचा विषय मंजूर करण्यात यावा. टंचाईचे कामासाठी शासनाने 4 कोटी 78 लाखाचे अनुदान दिले आहे. 90 टक्के शासन आणि 10 टक्के मनपा टाकणार आहे. पावसाची स्थिती बिकट आहे. धरणात शुन्य टक्के पाणीसाठा आहे. त्यातुन उपसा सुरू आहे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे या कामास मंजूरी देण्यात यावी.
ब्लिचिंग पावडर साधारणत: 196 मेट्रिक टन वर्षभरात लागते. सद्या दहा ते बारा दिवस पुरेल एवढाच साठा शिल्लक आहे.

श्री.मधुकर सावंत :सदरचा विषय मंजूर करण्यात यावा.

श्री.अमित भुईगळ :पावसाळा सुरू झालेला आहे औरंगाबाद मनपा हद्दीमध्ये एकुण सहा वार्ड येतात या सहा वार्डासाठी तीनच जेटींग मशिन आहेत. मशिन बाबत मागणी केल्यास दुरूस्तीस पाठविण्यात आलेली आहे म्हणुन सांगण्यात येते. आणखी तीन जेटींग मशिन खरेदी करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :हि वस्तुस्थिती आहे. सहा झोनमध्ये फक्त तीनच जेटिंग मशिन आहे.

मा.सभापती :सदरील विषय मंजूर करण्यात येत आहे.

श्री.मधुकर सावंत :30 वर्ष जुणी ड्रेनेज लाईन आहे ती वारंवार चोकअप होते त्या करीता जेटिंग मशीनचा वापर करण्यात येतो परंतु तीनच जेटिंग मशिन असल्याने प्रत्येक प्रभागात दिवस ठरवुन देण्यात आलेले आहे. त्यामुळे समस्या निर्माण होत आहे त्यामुळे येणाऱ्या बजेटमध्ये आणखी तीन मशिनसाठी येणाऱ्या बजेटमध्ये तरतुद ठेवण्यात यावी.

श्री.नासेर खान :प्रत्येक प्रभागासाठी एक मशिन देण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ :ड्रेनेज चोकअप झाल्यामुळे दुर्गंधी पसरू शकते.

मा.सभापती :शहर अभियंता यांनी जेटिंग मशिन बाबत खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :औरंगाबाद शहरात जलनि:सारण वाहिण्या साफ करणे यासाठी एकुण 3 जेटींग मशिन आहेत. जेटिंग मशिनसाठी दिवस ठरवुन दिलेला आहे आठवडयातील दोन दिवस प्रत्येक वार्डासाठी ठरविलेला आहे. परंतु प्रत्येक वार्डातील तक्रारींचा ओघ पहाता तीन मशिन हया पुरेशा ठरत नाही. त्यामुळे प्रशासनाला अनेक अडचणी येत आहे. त्यामुळे स.सदस्यांनी सुचविलेल्यानुसार 3 मशिन घेण्यात याव्या यास माझा दुजोरा आहे. यासाठी 60 लाखाचा खर्च करावा लागेल.

मा.सभापती :येणाऱ्या बजेटमध्ये 3 जेटींग मशिनसाठी तरतुद ठेवण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:कटकटगेट पडायला आलेला आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा. औरंगाबाद टाईम्स येथील पुलासाठी आर्थिक तरतुद केलेली आहे. त्याचे वर्क ऑर्डर झालेले आहे. पावसाळयाचे दिवस असल्याने येणे जाणे कठीण झालेले आहे. औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील पुलाचे काम का सुरू होत नाही.

श्री.सिकंदर अली :कटकट गेटचे काम सद्या चालु केलेले आहे. गेटच्या दक्षिणेकडील काम आज सुरू करण्यात आलेले आहे.

श्री.मधुकर सावंत :शहरात किती दरवाजे आहेत आणि किती दरवाजांचे काम सुरू आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सिकंदर अली :मोडकळीस आलेल्या दरवाजांचे कामे सुरू करण्यात आलेले आहे ते नौबत दरवाजा, खिजरी गेट, कटकट गेट या तिन्ही गेटचे काम सुरू करण्यात आलेले आहे. खिजरी गेटचे काम 80 टक्के पुर्ण झालेले आहे. नौबत दरवाजाच्या आतील आर्चीस टाकुन ते पडणार नाही म्हणुन काम सुरू आहे.

श्री.मधुकर सावंत :मोडकळीस आलेल्या दरवाजामुळे जिवीतहानी होऊ शकते काय?

श्री.सिकंदर अली :कटकटगेटची परिस्थिती अशी आहे की तो भुसभूशित झालेले आहे. केव्हा पडेल याची शक्यता नाकारता येत नाही. दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील पुलाचे वर्क ऑर्डर झालेले आहे काम सुरू का नाही झाले.

श्री.अमित भुईगळ :नौबत दरवाजाचे काम किती दिवसात करण्यात येईल.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :वर्क ऑर्डर झालेली आहे. यात थोडी तांत्रिक समस्या आहे ती दुर करून कामाला सुरूवात करण्यात येईल.

श्री.अमित भुईगळ :मेडीकल हौसिंग सोसायटीमध्ये गेल्या काही महिण्यांपासुन ड्रेनेजयुक्त पाणी येत आहे.

मा.सभापती :ऐणवेळी बीफचा विषय आलेला आहे तो मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणि संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराचे निविदाधारक श्री.अब्दुल हमीद कुरैशी यांचे दर रूपये 60=00 प्रति किलो असून निविदा धारकाशी चर्चा केल्यानंतर त्यांनी रूपये 55=00 प्रति किलो दराने बीफचा पुरवठा करणेस संमती दिलेली असल्याने सदर निविदाधारक यांचेकडून प्राणि संग्रहालयासाठी बीफ खरेदी करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 16 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड ब व क, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असलेल्या ब्लिचींग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी रू.4312000/- चे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक 927 दिनांक 25.01.2010 अन्वेय मंजूरी प्रदान केली आहे.

वार्षीक ब्लिचींग पावडर ग्रेड -1 चा पुरवठा करण्यासंबंधी ई-निविदा विभागामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदे प्रक्रिये अंतर्गत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या

दिवशी दर भरलेली एकच निविदा मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांची रूपये 12744/- प्र. मे.टन या दराची प्राप्त झाली. स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याने सदरील पुरवठ्याची फेर निविदा काढण्यात आली.

फेर निविदे अंतर्गत निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन को-या निविदांची विक्री होऊन दाखल करावयाच्या अंतिम तारखेपर्यंत दर भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

1. क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा - रूपये 12555/- प्र.मे.टन
2. फोनिक्स केमिकल्स औरंगाबाद - रूपये 14434/- प्र.मे.टन

प्राप्त दरांपैकी मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांचे दर सर्वात कमी म्हणजेच रूपये 12555/- प्र.मे.टन असे आहेत. या दराने खरेदी केल्यास पुरवठ्या करीता खालीलप्रमाणे खर्च येईल.

196.00 मे.टन X रूपये 12555/- प्र.मे.टन = रूपये 24,60,780/-

तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा प्राप्त दर हे 42.93% कमी दराचे आहे. तसेच सन 2009-10 च्या दरसूचीशी (रूपये 17000/- प्र.मे.टन) तुलना केल्यास 26.14 % कमी दराचे आहे. मागील वर्षीच्या मंजूर दरानुसार (रूपये 12570/- प्र.मे.टन) तुलना केल्यास 0.119% कमी दराचे आहे. मा.आयुक्त यांनी सदरच्या दराने खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिफारस केली आहे.

करीता मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांची ब्लिचींग पावडर ग्रेड-1 च्या वार्षीक पुरवठ्याची निविदा रूपये 12555/- प्र.मे.टन या दराने रक्कम रूपये 24,60,780/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असलेल्या ब्लिचींग पावडर ग्रेड-1 चा पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांची ब्लिचींग पावडर ग्रेड-1 च्या वार्षीक पुरवठ्याची रूपये 12555/- प्र.मे.टन या दराच्या निविदेस रक्कम रूपये 24,60,780/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 17 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन 2009 मध्ये पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी झाल्याने जायकवाडी जलाशयाच्या पाणी पातळीत फारच अल्प प्रमाणात वाढ झाली त्यामूळे सन 2010 च्या उन्हाळयातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन महानगरपालिकेने तातडीने आपत्कालीन पाणी पुरवठा योजनेचे संकल्पन करून योजना उभारणीच्या दृष्टीने रक्कम रू.11.53 कोटीचा प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी शासनास सादर केला होता. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.705 दिनांक 07.11.2009 नुसार रूपये 11.53 कोटीच्या अंदाजपत्रकाच्या प्रसतावास व योजनेसाठी येणाऱ्या एकूण खर्चाच्या 10% खर्च (लोकवर्गणी) महानगरपालिकेने करण्यास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

दिनांक 28.01.2010 रोजी टंचाईचे लेखाशिर्ष 2245 अंतर्गत अनुदान मंजूर करणे करीता मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या बैठकीतील सूचनेनुसार मुळ आपत्कालीन पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावातील विविध उपांगाचा अभ्यास करून रक्कम रू.4.27 कोटीचा सुधारीत प्रस्ताव पुन:विचारार्थ शासनाकडे सादर करण्यात आला. शासन निर्णय क्र./टंचाई/2410/प्र.क्र.26/पापु 14 मंत्रालय, मुंबई- 32 दि. 27 एप्रिल

2010 नुसार महानगरपालिकेने सादर केलेल्या या प्रसतावास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच शासन निर्णय क्र. टंचाई 2010/प्र.क्र.78/पापु 14 मंत्रालय, मुंबई दि.6 मे 2010 व शासन निर्णय क्र. टंचाई 2010/प्र.क्र.78/पापु 14 मंत्रालय, मुंबई दि. 13 मे 2010 नुसार शासनाने अनुक्रमे 40 लक्ष व 100 लक्ष अनुदान महानगरपालिकेस वितरीत केले आहे.

महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रसतावास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यामूळे आपत्कालीन पाणी पुरवठा योजना उभारणीसाठी वर्तमानपत्रात व इ-टेंडरींग द्वारे निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तिन निविदा प्राप्त झाल्या. निविदेतील दरांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि.मुंबई | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24.30% जास्त दराने |
| 2. | मे.हायटेक इंजिनिअर्स मुंबई | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27% जास्त दराने |
| 3. | मे.अमित इंजिनिअर्स औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या तिन निविदामध्ये तुलनात्मकदृष्ट्या मे.एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि.मुंबई यांचे दर सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24.30% जास्त असे आहेत. सदरील दर जास्तीचे असल्यामूळे दिनांक 14.6.2010 रोजी मा.आयुक्त यांचे दालनात मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर्सच्या प्रतिनिधी सोबत दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करण्यात आल्या. त्यात एजन्सीने दर कमी करून सदरील काम अंतिमतः अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.9% जास्त दराप्रमाणे करणेस संमती दिली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी अंदाजपत्रक दरापेक्षा 9.9% जास्त दराची निविदा मान्यतेसाठी शिफारस केली आहे. सध्या अद्यापही चांगला पाऊस न झाल्यामूळे धरणातील मृत साठ्यामधून औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी उपसा सुरू आहे. धरणातील सद्यस्थिती पाहता आणि पाऊस चांगला न झाल्यास धरणात पाणी येण्यास उशीर होईल. त्यामुळे हे काम करणे आवश्यक आहे.

तरी जायकवाडी जलाशय येथील आपत्कालीन पाणी पुरवठा योजना उभारणीच्या कामासाठी मे.एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. मुंबई यांची अ.प. दरापेक्षा 9.9% जास्त दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी जलाशयाच्या पाणी पातळीत फारच अल्प प्रमाणात वाढ झाल्यामूळे संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन महानगरपालिकेने तातडीने आपत्कालीन पाणी पुरवठा योजनेचे संकल्पन करून सदरील योजना उभारणीच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि.मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून 9.9% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा :</u>**

| | |
|---|---|
| श्री.मधुकर सावंत | :वर्तमानपत्रात शहरातील रस्ता पॅचवर्कच्या कामासाठी 60 लाख रूपये विना निवीदा ऐण पावसाळयात एजन्सी फिक्स करून मंजूर करण्यात आलेले आहे. पावसाळयात डांबरीकरणाचे पॅचवर्कचे कामे करता येतात का खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :संततधार पाऊस असला तर पॅचवर्क करता येत नाही, उघडीप मिळाली तर पॅचवर्क करता येते. प्रत्येक वार्डात दोन दोन निवीदा काढुन मग हे काम करण्यात येत आहे. |

श्री.मधुकर सावंत :निवीदा 9 लाख 82 हजारांचीच का तयार करण्यात आली. सभागृहाला बायपास करून हे कामे केलेली आहे.

शहर अभियंता :10 लाखाच्या आतील कामे मा.आयुक्तांनी मंजूर केलेली आहे. पाच ते दहा लाखाच्या आतील कामांची माहिती मा.स्थायी समितीला पाठवित असतो आणि ती पाठविणार आहोत.

श्री.मधुकर सावंत :निवडणुकीच्या काळात डांबरीकरणाचे कामे निवीदा काढुन करण्यात आले होते. सदरील 60 लाखाचे काम हे टेंडर करून का नाही करण्यात आले याचे कारण काय होते.

शहर अभियंता :प्रत्येक वार्डमध्ये वेगवेगळी एजन्सी असावी.

श्री.प्रल्हाद निमगांवकर:मागील वर्षी वर्क ऑर्डर झालेले कामे का सुरू करण्यात आलेले नाही.

मा.सभापती :सभागृहाची दिशाभुल करून प्रशासन शहर अभियंता आपल्या स्तरावर इस्टीमेट तयार करून काम करीत असेल तर या सभागृहाचा तो अवमान ठरला जाईल. जे कामे मंजूर केले गेले ते कामे स्थायी समिती समोर घेण्यात यावे आणि काम थांबविण्यात यावे. एकत्रित करून टेंडर करण्यात यावे. हे कामे रद्द करण्यात येवुन यानंतर अशाप्रकारचे ठराव मंजूर झाल्यास संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रल्हाद निमगांवकर:माझे वार्डातील डांबरीकरणाचे कामासंदर्भात वारंवार विनंती केली ते काम करण्यात आले नाही. चिकलठाणा येथील रोडची अवस्था बिकट झालेली आहे. सर्वात जास्त रिव्हेन्यु त्या भागातुन मिळत आहे. सर्वच संघटनेची मागणी आहे की, तेथील रस्त्यांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी. त्या ठिकाणी कामे करण्यात येत नाही.

मा.सभापती :ज्या ठिकाणाहुन जास्त उत्पन्न मिळते तेथील कामे केली जात नाही व टेंडर न काढता परस्पर कामे केली जातात. हे योग्य नाही.

शहर अभियंता :एमआयडीसी चिकलठाणा येथील मुख्य रस्त्याचे काम सुरू केलेले आहे.

मा.सभापती :दोन महिणे काम सुरू होऊन झालेले आहे अजुन काम पुर्ण झालेले नाही. येणाऱ्या अर्थसंकल्पात एम.आय.डी.सी साठी भरीव निधी ठेवण्यात यावा.

श्री.नासेर खान :स.सदस्यांची जी समस्या आहे ती सर्वच वार्डातील आहे. 15 वर्षापासुन सिल्लेखाना रोडबाबत विनंती करत आहे परंतु काहीही कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :स.सदस्यांची भावना लक्षात घेऊन प्रशासनाने तात्काळ पहाणी करून काम करण्यात यावे तसेच ज्या ज्या वार्डात कामाच्या आवश्यकतेप्रमाणे स्थळ पहाणी करून कामे करण्यात यावी्. तसेच प्रशासनाने अर्थसंकल्प लवकरात लवकर सादर करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:नेहरू भवन हे पोलिस प्रशासनास देण्याची कार्यवाही सुरू आहे काय? माहिती देण्यात यावी. सन 1976-77 साली गरीबांची प्रॉपर्टी संपादन करून नेहरू भवनची उभारणी केलेली आहे. नेहरू भवन येथे गोर गरीब मुला मुलींचे लग्नसोहळे पार पडतात. ज्या उद्देशासाठी नेहरू भवनचे संपादन करण्यात आले तो उद्देश बदलण्याचे अधिकार आहे काय? उच्च,सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भांत निर्णय दिलेले आहे. महानगरपालिकेला उद्देश बदलण्याचा अधिकार नाही. नेहरू भवन येथे गोर गरीबांचे लग्न सोहळे पार पडतात इतर सामाजिक

कार्यक्रम त्या ठिकाणी होत असतात. नेहरू भवन पोलीस विभागाला देण्याचे कारण काय आहे. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :नेहरू भवन ही एक चांगली मोठी इमारत आहे. महानगरपालिकेच्या संपत्ती मधील ती एक संपत्ती आहे. निवडणूकीच्या वेळेस दहा लाख रूपये खर्च करून नेहरू भवन चांगल्या स्थितीत करून घेतले यापुर्वी अतिशय घाण, संडास चोकअप झालेले. पाण्याची गळती अशी स्थिती होती. निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय तिथे असल्याने स्वच्छता करून घेण्यात आली होती. त्या ठिकाणी ऑफिस असावे म्हणुन काही दिवस बंद ठेवले. फार दिवसांपासुन अतिशय कमी भाडे ठेवण्यात आले होते. त्याच्यात वाढ करावी असे ठरले होते तसेच ते चांगल्या कार्यक्रमासाठी देण्यात यावे अशा प्रकारची चर्चा सुरू होती. सी.पी.साहेबांबरोबर ज्या काही बैठका झाल्या त्यामध्ये कायदा सुव्यवस्थेमध्ये मनपाकडून काय करता येईल म्हणून त्यांनी जागेची मागणी केली होती. काही ठिकाणे समोरे आले होती. चर्चा झालेली आहे. अद्यापर्यंत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:पोलीस विभागास जागा देण्यास आमचा विरोध नाही. नेहरू भवन हे गोर गरीबांसाठी असल्याने व्यत्यय आणू नये.

मा.सभापती :नेहरू भवन अस देता येत नाही आणि ते देऊ नये. मनपाच्या दुसऱ्या एखादया वास्तुचा उपयोग होत नसेल त्या ठिकाणी त्यांना देण्यात यावे. स्थायी समितीला डावलून जे कामे केलेले आहे. ते कामे रद्द करण्यात यावे. महानगरपालिका ज्या ठिकाणाहुन पाणी उचलण्यात येते ते सात पंप अजुनही महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे नावावर आहे. मनपाच्या नावावर कार्यवाही केल्यास मनपाचे महिण्याला 35 लाख रूपये वाचणार आहे. यापुढे प्रशासन काही कार्यवाही करणार आहे की, नाही.

शहर अभियंता :पत्र देण्यात आले आहे.

मा.सभापती :पत्र देऊन भागणार नाही. त्यांना कायदेशीर पत्र दिलेले आहे. मनपा मा.न्यायालयात जाऊ शकतो.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):महिण्याला विद्युत बिल येते त्यात इलेक्ट्रिसिटी डयुटीचे पैसे लावण्यात येते. रूपये 35 लाख. आजही ते कनेक्शन महा.जिवन प्राधिकरण यांच्या नावांवर आहे.त्याबाबतीत फॉलोअप ठेवलेला आहे.त्यांनी पत्र दिलेले आहेकी मनपाने थकबाकीची भरणा करावी याबाबतीत प्रशासन त्यांचेशी चर्चा करीत आहे.

मा.सभापती :मनपाचे कनेक्शन मनपाच्या नावांवर पाहिजे. ज्यांच्या नावांवर थकबाकी आहे त्यांच्याकडून वसुल करण्यात यावे. MSEB मनपाकडे 288 कोटींची थकबाकी दाखवित आहे. कनेक्शन कुणाच्या नावांवरती आहे.

कार्य.अभियंता (श्री.पानझडे):महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, बिल मनपाला विभागीय आयुक्तां मार्फत लागते.

मा.सभापती :मनपा हि सेवाभावी संस्था आहे.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):मा.सभापती यांचे मार्फत एक बैठक आयोजित करण्यात यावी त्यात चिफ इंजिनियर यांना बोलावुन चर्चा करण्यात येईल.

मा.सभापती :या संबधी एक बैठक आयोजित करून मनपाचे महिण्याचे 35 लाख रूपये वाचविण्यात यावे. ज्या प्रमाणात मनपा इतर वस्तुंवर जकात लावण्यात येते MSEB ही एक खाजगी कंपणी झाली आहे महावितरण कंपणी झाली आहे. त्यावर कर लावण्यात आला तर जे महिण्याला अडीच कोटी रूपयांची भरणा केली जाते ते वाचतील व शहरात जेवढे लाईटचे पोल, डिपी आहेत त्यास टॅक्स लावला पाहिजे. MSEB ही वितरण संस्था आहे व मनपा ही सेवाभावी संस्था आहे. मा.आयुक्तांनी याबाबतीतच्या तरतुदींचा अभ्यास करून मा.न्यायालयात दाद मागावी. मनपाचे अडीच कोटी रूपये महिण्याचे वाचतील व मनपा आर्थिक दृष्टया सक्षम होईल. 40 कोटींची पाणीपट्टी बाकी आहे ती वसुल होत नाही. स्लम, झोपडपट्टीमध्ये पाच ते दहा हजार रूपये थकबाकी आहे ते भरू शकत नाही. महिण्याला तीन ते चार हजार रूपयांच्या वर त्यांचे उत्पन्न नाही. प्रत्येक वार्डात ज्या प्रमाणे पिग्मी एजंट सारखी व्यवस्थ्या आहे त्यानुसार महानगरपालिका महिण्याला 100, 200 रूपये पाणी बिल वसुल करावे. जेणे करून मनपाला उत्पन्न प्राप्त होईल्. ज्या ठिकाणी महिण्याची 100 टक्के वसुली आहे त्या ठिकाणाहुनही महिण्याला वसुली केली जावी. केबल कनेक्शनचे गरीबातील गरीब माणुस महिण्याला 150 ते 200 रूपये अदा करत असतो. 150 रूपये प्रति महिणा वसुली केल्यास वसुली जास्त प्रमाणात होईल व गरीब कमी उत्पन्न असणारे कुटूंब त्याची भरणा करतील. शहरातील जेवढे व्यवसायिक नळ कनेक्शन आहे त्याचा सर्वे प्रशासनाने करावा. त्याच्यावरील जे ठरलेले चार्ज आहे तो वसुल करण्यात यावा. महानगरपालिका एका वर्षात सक्षम करू. ज्या महानगरपालिका सक्षम आहे त्यांचा प्रशासनाने सर्वे करून कोणत्या प्रकारे टॅक्स लावण्यात आलेले आहे उत्पन्नाचे विविध स्तोत्र यांचा अभ्यास करावा. तरी या सर्वांवर अंमलबजावणी करण्यात यावी.

राष्ट्रगीनंतर सभा संपल्याचे मा.सभापती, स्थायी समिती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद